आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारच्या हमीभाव योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन खरेदीला राज्यात येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार

- मतदार याद्यांतील त्रुटी दूर करण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीचा मुंबईत मोर्चा, मताचा अधिकार जतन करण्यासाठी मतभेद विसरून एकत्र येण्याचं शरद पवार यांचं आवाहन

- देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत घट

- ६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं उद्या मुंबईत उद्घाटन

**आणि**

- आयसीसी एकदिवसीय महिला क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत उद्या नवी मुंबईत भारत आणि दक्षिण आफ्रिके दरम्यान अंतिम सामना

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांच्या खरेदीला येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना ॲपद्वारे किंवा खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करता येईल. या नोंदणीला ३० ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे तर अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. खरेदीचा कालावधी १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी असेल. शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा आणि नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पणन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्रातल्या प्रादेशिक कार्यालयानं ऑगस्ट महिन्याच्या  पहिल्या आठवड्यापासून 'खुला बाजार विक्री योजने' अंतर्गत तांदळाची विक्री सुरू केली आहे. खरेदीदारांनी अन्न महामंडळाच्या  ई-लिलावात बोली लावावी, असं आवाहन महामंडळाने केलं आहे. येत्या ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी तांदळाचा ई-लिलाव होणार असून, यासाठी  एकूण १० हजार  मेट्रिक टन तांदूळ उपलब्ध केला जाईल, असं यात म्हटलं आहे. किमान बोली १ मेट्रिक टन, तर प्रति बोलीदार ७हजार मेट्रिक टनांची कमाल मर्यादा आहे. अन्नधान्याच्या वाढत्या बाजारभावांवर नियंत्रण ठेवणं आणि खुल्या बाजारात पुरेशी उपलब्धता निर्माण करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणं, हे 'खुला बाजार विक्री' योजनेचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीनं आज मुंबईत 'सत्याचा मोर्चा' काढला आहे. या मोर्चात जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, माकपचे राज्य सचिव डॉ अजित नवले, भापकचे सुभाष लांडे सहभागी झाले आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर लोकांच्या मनात संसदीय लोकशाहीबद्दल अविश्वास निर्माण झाला असून सत्तेचा सातत्याने गैरवापर केला जात आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. मताचा आणि लोकशाहीचा अधिकार जतन करणं हे आपलं कर्तव्य असून राजकीय मतभेद विसरून सर्वांनी एक व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

मतदार याद्यांमधले त्रुटीचे पुरावे न्यायालयात देणार असून न्यायालयाला दाद मागणार असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. सर्व नागरिकांनी मतदार यादीत आपापली नावं तपासून घ्यावीत असं आवाहनही त्यांनी केलं. तर

मतदार याद्यांमधले दोष दूर केल्यानंतरच निवडणुका घ्याव्यात याचा पुनरूच्चार मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला.

**होल्ड बाईट राज**

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनीही सभेला संबोधित केलं. आघाडीतल्या पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येनं या मोर्चात सहभागी झाले होते.

विरोधी पक्षांनी निवडूक आयोगाच्या विरोधात काढलेल्या मोर्चाला भाजपानेही मोर्चा काढून प्रत्युत्तर दिलं. विरोधी पक्ष दुटप्पी असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली.

**<><><><><>**

जीएसटी करप्रणालीत केलेल्या सुसुत्रीकरणानंतर ऑक्टोबर महिन्यातल्या जीएसटी संकलनानं गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ४ पूर्णांक सहा दशांश टक्के इतकी वाढ नोंदवली आहे. या सणासुदीच्या काळात १ लाख ९५ हजार कोटी इतकं जीएसटी संकलन झालं आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत अर्थात एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ९ टक्क्यांनी वाढ झाली असून ते १२ लाख ७४ हजार कोटी रुपये इतकं झालं आहे. याशिवाय ऑक्टोबरमध्ये सलग दहाव्या महिन्यात जीएसटी संकलन १ लाख ८ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिलं आहे.

**<><><><><>**

नागपूर स्कील सेंटरमुळे विदर्भातल्या लाखो युवकांच्या रोजगाराचं स्वप्न साकार होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. नागपूर स्कील सेंटर या कौशल्य विकास उपक्रमाचं लोकार्पण आज गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. स्मार्ट शहरांसोबत स्मार्ट गावं देखील निर्माण व्हावीत, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली. पुढील पाच वर्षात

विदर्भातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात ५ हजार युवकांना रोजगार देण्याचं उद्दिष्ट समोर ठेवावं, त्याकरता कौशल्य केंद्रांची संख्या वाढवावी, असं ते म्हणाले.

<><><><><>

देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत आजपासून घट झाली आहे. घरगुती वापराच्या १४ किलो २०० ग्रॅम वजनाच्या एल पी जी सिलेंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत साडे चार ते साडे सहा रुपयांपर्यंत घट झाली असून यानुसार आता मुंबईत हा सिलेंडर १ हजार ५४२ रुपयांना मिळेल.

<><><><><>

६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं उद्या मुंबईत उद्घाटन होणार आहे. कोविड काळात खंड पडलेल्या या कार्यक्रमाला पुन्हा प्रारंभ होईल. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित अरुण कशाळकर उपस्थित राहणार आहेत. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार आणि प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांचं पथक आपली कला सादर करणार आहेत. येत्या २९ नोव्हेंबरपर्यंत देशभरातल्या २४ आकाशवाणी केंद्रांवर हिंदुस्तानी, कर्नाटक शैलीतलं शास्त्रीय संगीत तसंच सुगम आणि लोकसंगीत अशा विविध परंपरांमधले कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

<><><><><>

आयसीसी एकदिवसीय महिला क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिकेत नवी मुंबईत अंतिम सामना रंगणार आहे. दुपारी ३ वाजता सामन्याला सुरुवात होईल. गुवाहाटी इथं झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं इंग्लंडचा १२५ धावांनी एकतर्फी पराभव केला तर गुरुवारी डी वाय पाटील स्टेडियम इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात विजयासाठी दिलेल्या मोठ्या

धावसंख्येचा पाठलाग करताना भारताच्या जेमिमा रॉड्रिग्जच्या झुंजार शतकाच्या बळावर भारतानं ऑस्ट्रेलियाचा ५ गडी राखून पराभव केला.

**<><><><><>**

नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी **पालघर** जिल्ह्यातल्या सर्व पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ‘रन फॉर युनिटी’ मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमात पोलीस दलातले अधिकारी, अंमलदार तसंच सुमारे ८,००० नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी उपस्थितांना एकतेची शपथही देण्यात आली.

**अकोला** जिल्ह्यातल्या **मूर्तिजापूर** इथंही रन फॉर युनिटी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अन्न आणि औषध विभागानं ऑगस्ट महिन्यापासून केलेल्या कारवाईत सुमारे ४२ हजार किलो पेक्षा जास्त भेसळयुक्त खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. यासोबतच भेसळयुक्त भगर, मिरची पावडर, मसाले अशा पदार्थांचे साठेही जप्त करण्यात आले असून एकूण जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत सुमारे ९२ लाख रुपयांहून अधिक आहे, अशी माहिती अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकानं मुंबई विमानतळावर एका विशेष कारवाईत ४ किलो ७०० ग्रॅम कोकेन जप्त केलं. आंतरराष्ट्रीय बाजारात या कोकेनची किंमत अंदाजे ४७ कोटी रुपये आहे. या प्रकरणात आतापर्यंत पाच संशयितांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या बोरिवली या उपनगरातल्या देवीपाडा मेट्रो स्थानकाजवळ पश्चिम द्रुतगती मार्गावर आज सकाळी एका चारचाकीला आग लागली. आग लागल्याचं लक्षात येताच चालक वाहनातून खाली उतरल्यानं दुर्घटना टळली. मात्र, या मार्गावरची वाहतूक काही काळासाठी खोळंबली होती. पोलीस आगीच्या कारणांचा शोध घेत आहेत.

**<><><><><>**

बुलडाण्यात शेतीतल्या साहित्याची चोरी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेनं अटक केली. पोलिसांनी या टोळीकडून सुमारे ७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपस सुरु आहे.

**<><><><><>**

धुळे तालुक्यात चांदे शिवारातल्या एका हॉटेलवर छापा टाकून पोलिसांनी खोट्या नोटा जप्त केल्या. याप्रकरणी एकाला अटक केली असून त्याच्याकडून सुमारे २२ हजार रुपयांच्या ५०० आणि १०० रुपयांच्या नोटा जप्त केल्या आहेत.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात शिरपूर शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी छापा टाकून ६०० किलो गांजाची झाडं जप्त केली आहेत. याची किंमत सुमारे १२ लाख रुपये आहे. पोलिसांनी जंगलातून ३ किलोमीटर पायी वाट काढत ही छापेमारी केली. तूर आणि कपाशी पिकाच्या आत शेतजमिनीवर अंदाजे ३ ते ५ फुट उंचीच्या गांजाच्या झाडांची लागवड केल्याचं आढळून आलं. ही लागवड करणाऱ्या आरोपीविरुध्द शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार शैलेंद्र धवन यांचं आज चंदीगड इथं निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. गेले काही दिवस ते आजारी होते. धवन हे फ्री प्रेस जर्नल मुंबई चे संपादक होते. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी आज पावसानं हजेरी लावली. **सांगली** जिल्हात अनेक ठिकाणी आज दिवसभर जोरदार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं. पाऊस लांबल्यामुळे भाजीपाल्याचं नुकसान होत आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल रात्रीपासून पाऊस पडत असून शेतीचं मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**